# सोमेश्वर साखर कारखान्याकडून काटामारी

जयसिंगपूर (प्रतिनिधी) : बारामती येथील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने उसाच्या वजनात मोठ्या प्रमाणात काटामारी केली असून याला जबाबदार असणाऱ्या कारखान्याच्या अध्यक्षावर तसेच संचालकांवर त्वरित गुन्हा दाखल करावा, अन्यथा साखर आयुक्तांना घेराओ घालू असा इशारा खासदार राजू शेट्टी यांनी साखरआयुक्त विजयकुमार सिंघल यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

सिंघल यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यामध्ये गाळपासाठी वजन काट्यावर ऊस नेला असता. भरलेल्या गाडीचे वजन व रिकाम्या गाडीचे वजन यामध्ये जवळपास ४०० किलोची तफावत आल्याचे निदर्शनास येते. यावरून साखर कारखान्याने शेतकऱ्यांची मोठी आर्थिक लुबाडणूक केली असल्याचे स्पष्ट होत आहे. हा सरळ सरळ काटामारीचा प्रकार असून या संबंधित साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांची मोठी फसवणूक करून आर्थिक लुबाडणूक सुरू आहे. यापूर्वी राज्याचे सहकारमंत्री मा. ना. हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीत पुण्यामध्ये संयुक्त बैठक झालेली होती. तसेच या बैठकीत आपण स्वतः उपस्थित होता. यामध्ये काटामारी करणाऱ्या साखर कारखान्यावर कडक कारवाई करणार असल्याचे सांगितले होते. तसेच मुंबई येथील मंत्रालयात मा. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणसो यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झालेली होती. या बैठकीत आपण स्वतः तसेच वजनमापक नियंत्रक महादेवराव सानप व मा. ना. हर्षवर्धन पाटील यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये काटामारी करणाऱ्या साखर कारखान्यांवर कडक कारवाई करण्याचे ठरले होते. तसेच राज्यातील सर्वच साखर कारखान्यांतील वजनकाटे संगणकीय करून इलेक्ट्रॉनिक वजनकाटे बसवायचे तसेच सर्व वजनकाटे ऑनलाईन करून सर्व वजनकाटे वजनमापन नियंत्रक यांच्या देखरेखीखाली करण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. मात्र या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लुबाडणूक सुरू आहे. राज्यात अनेक साखर कारखान्याविरूध्द काटामारीच्या मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. मा. सतीशराव काकडेसो यांनी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या काटामारीच्या प्रकाराची आपल्याकडे तक्रार दाखल केलेली आहे. या तक्रारीवर आपल्याकडून काहीही कार्यवाही झालेली नाही. संबंधित तक्रारीची त्वरित दखल घेऊन सोमेश्वर साखर कारखान्याचे अध्यक्ष, कार्यकारी संचालक व सर्व संचालकाविरूध्द त्वरित चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. तसेच शेतकऱ्यांची आर्थिक लुबाडणूक करून शेतकऱ्यांचा विश्वासघात केला म्हणून संबंधितावर फौजदारू गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात यावी. सदर निर्णय १९ मार्च १२ पर्यंत घेण्यात यावे अन्यथा, २० मार्च रोजी आपल्या कार्यालयावर राज्यातील ऊस उत्पादकांचा भव्य मोर्चा आणून कार्यालयास घेराव घालण्यात येईल. याची दखल घेण्यात यावी.

स्वाभिमानी विचार प्रति,

Book-Post

RNI No. - MAH/MAR/2005/16213

Rgd. No.L2/17/RNP/K.L.P/234/12-14

वर्ष ७ | अंक ८ | १५ मार्च २०१२ | किंमत ५ रुपये | पाने २०

# स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी



कृषीप्रधान देशात शेतीची दूरवस्था

पान ६ वर ▸

## कांदा उत्पादकांसाठी रिंगणात !



सटाणा : स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आयोजित कांदा परिषदेत मार्गदर्शन करताना खासदार राजू शेट्टी. शेजारी सदाभाऊ खोत, संघटनेचे उत्तर महाराष्ट्रप्रमुख दीपक पगार, रविकांत तूपकर, बाजार समितीचे सभापती संजय वाघ, नानाजी दळवी, जगदीश इनामदार आदी.

बातमी पान ६ वर ▸



♦ वर्ष ७ ♦ अंक ८ ♦ १५ मार्च २०१२ ♦ पाने २०

स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

♦ कार्यकारी संपादक ♦
डॉ. महावीर अक्कोळे

♦ सह संपादक ♦
डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार

♦ निवासी संपादक : सदाभाऊ खोत

♦**मानद सल्लागार** : मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या.बी.जी.कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर ♦ **व्यवस्थापक** : सुभाष शेट्टी ♦ **कार्यालय** : भारत पतसंस्थेच्या [illegible], पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा अण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशनजवळ, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२८ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांनी आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

Email : rajushetti@gmail.com

**वार्षिक वर्गणी रु. १००/-**

## संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

# शेतकऱ्यांचे लुटारू

बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांनी काही दिवसापूर्वी व्यापाऱ्यांना धो-धो धुतले नि आपला सगळा राग या शेतकऱ्यांनी व्यक्त केला. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची जशी लूट व्हायची तशी बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांची होऊ लागलेली आहे. केवळ ३० रूपये प्रतिकिलो दराने बेदाणे विकत घेऊ लागल्याने शेतकरी हवालदील झालेला आहे. लुटारू व्यापाऱ्यांची भली मोठी साखळी कार्यरत आहे. सध्या बाजारात २४० रूपये किलो दराने बेदाणे विकले जात आहेत. मग १०० रूपयेच्या वर दर का दिला जात नाही. असा संतप्त सवाल उत्पादक शेतकरी वर्गातून होत आहे. शेतकरी आणि ग्राहक या दोघांचीही लूट मोठ्या प्रमाणात होत आहे. असे असताना शासन मात्र यामध्ये कोणतीच दखल घेतली जात नाही. गृहमंत्री आर. आर. पाटील हे मात्र यावर मूग गिळून गप्प आहेत. या शेतकऱ्यांच्या जीवावरच आर. आर. निवडून आलेले आहेत. बेदाणा उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरला असताना, आर. आर. पाटलांनी या आंदोलनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. फक्त खासदार राजू शेट्टी हे एकमेव नेते बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला धावून गेले. पाच हजार शेतकऱ्यांच्या उपस्थितीत बेडगमध्ये खासदार राजू शेट्टींनी बेदाणा परिषद घेतली.

शेतकऱ्यांची लूट होत असताना फोरमचे नेतेही शांत आहेत. व्यापाऱ्यांनी अक्षरशः लूट चालवली आहे. बरं असो बेदाणा उत्पादक शेतकरी आता जागा होऊ लागलेला आहे. त्यांच्यामध्ये सुरू झालेली जागृती निश्चितच सुखावह आहे. दुष्काळी टापूत शेतकऱ्यांची सुरू असलेली लूट कुठेतरी थांबली पाहिजे. त्यासाठी मोठे आंदोलन उभे राहण्याची नितांत आवश्यकता आहे. खासदार राजू शेट्टी या बेदाणा उत्पादकांना आर्त हाक दिलेली आहे. वेळीच जागे होणे हे बेदाणा उत्पादकांच्याच हिताचे आहे. अन्यथा चालू असलेली लूट अखंडपणे सुरू राहणार आहे.

# कृषीप्रधान देशात शेतीची दूरवस्था

विशेष लेख

खा. राजू शेट्टी



भारत हा कृषीप्रधान देश गणला जातो. आजही देशातील जवळपास ६२ टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. असे असले तरी अंदाजपत्रकात या क्षेत्रासाठी केलेली तरतूद अत्यंत अपुरी असते. किंबहुना या क्षेत्राच्या विकासाचा गांभीर्याने विचारच केला जात नाही. शेतमालाच्या आयात-निर्यातीबाबतही कुचकामी धोरणे राबवली जात आहेत. त्यामुळे शेती वरचेवर आतबट्ट्याची ठरू लागली आहे. हे चित्र कधी बदलणार हा खरा प्रश्न आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाची अनेक क्षेत्रात प्रगती झाली असली तरी त्याला कृषी क्षेत्र अपवाद राहिले असेच म्हणावे लागेल. कारण शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी अजूनही मोठा पल्ला गाठायचा आहे. मुळात सुरूवातीपासून शेती व्यवस्थेत पायाभूत सुविधांची वानवा राहिली आहे. विशेष म्हणजे अगदी आतापर्यंतही याकडे म्हणावे तितके लक्ष दिले गेलेले नाही. भारतीय शेतकऱ्यांनी जागतिक बाजारपेठेत जाऊन स्पर्धा करावी अशी अपेक्षा राज्यकर्ते व्यक्त करतात. पण आपला शेतकरी स्वत:च्या शेतापर्यंतही धड पोहोचू शकत नाही अशी परिस्थिती आहे. याचे कारण गावातील पाणंद रस्ते अजूनही नीट नाहीत. या रस्त्यांची प्रचंड दूरवस्था कायम आहे. अशा रस्त्याने शेतमालाची वाहतूक होऊ शकत नाही. सिंचनाची अवस्थाही तशीच आहे. कितीही प्रयत्न केले तरी ३०-३२ टक्के क्षेत्राच्या वर सिंचनाच्या सुविधा पोहोचू शकलेल्या नाहीत. त्यातच पाऊस वरचेवर बेभरवशाचा होऊ लागला आहे. या शिवाय बि-बियाण्यांची टंचाई, मुबलक आणि वेळेवर न होणारा पतपुरवठा, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव तसेच मध्यस्थ, दलालांकडून होणारे शोषण, अपुरे विमा संरक्षण अशा अनेक समस्या शेती क्षेत्रासमोर उभ्या आहेत. यावर उपाययोजना करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या जमिनी कशा लाटता येतील याकडेच राज्यकर्त्यांचा कल आहे. पुंजीपतींना शेतीत गुंतवणूक करण्यात रस नाही.

पान ४ वर ▶




# कृषीप्रधान देशात शेतीची दूरवस्था

▶ पान ३ वरून

पण शेतकऱ्यांची शेती ओरबाडून घेण्यात रस आहे. त्यासाठी राज्यकर्त्यांना खूष करण्याची त्यांची तयारी असते. देशात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंदर्भात मोठा बोलबाला झाला. या निर्णयाबद्दल अनेकांनी स्वतःची पाठ थोपटली. पण त्याच वर्षीच्या म्हणजे २००८ च्या अर्थसंकल्पात ७८ हजार कोटी रूपयांच्या कर्जमाफीवर चर्चा झाली त्याच्या एक टक्कासुध्दा चर्चा औद्योगिक क्षेत्र विकासाच्या तीन लाख कोटी रूपयांच्या करसवलतीबद्दल झाली नाही. ना हा विषय राजकारण्यांनी चर्चेत आणला ना प्रसिध्दी माध्यमांनी.

या देशातील ६२ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. परंतु ते स्वतःच्या पायावर उभे राहणे सोडाच पण गळ्याला फास लावण्यासाठी झाडाच्या शोधात फिरत आहेत. तरिही आपला देश भविष्यात आर्थिक महासत्ता होणार असल्याचे मायावी स्वप्न या देशातील जनतेला दाखवले जात आहे. सतत तोट्यात जात असलेल्या शेती उद्योगामुळे विकासदर सातत्याने कमी होत आहे. ६२ टक्के लोक अवलंबून असलेल्यांच्या आर्थिक वृध्दीचा दर तीन, साडे तीन टक्के राहत असेल तर उरलेल्या ३८ टक्क्यात कोणाची आर्थिक प्रगती होत आहे असा प्रश्न पडतो. कृषी क्षेत्राचा विकास दर घटत चालला असताना दुसऱ्या बाजुला या देशातील विद्वान अन्नसुरक्षेच्या प्रश्नावर तावातावाने चर्चा करताना दिसतात. गोरगरिबांना अन्नधान्य स्वस्तात मिळाले पाहिजे ही गोष्ट खरी. पण हे गोरगरिब नेमके कोण याचा प्रथम शोध घेतला पाहिजे. या देशात आजवर अनेक निर्वासितांना आश्रय देण्यात आला. या निर्वासितांच्या प्रश्नांवर मोठमोठ्या चर्चाही झाल्या. मग हे निर्वासित पाकमधून आलेले असोत, काश्मिरी पंडीत असोत, तिबेटी असोत वा बांगला देशी, त्यांच्या प्रश्नांवर मानवतेच्या दृष्टीकोनातून चर्चा करण्यात आली. पण गेल्या काही वर्षात या देशातील ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुरांचा मोठा लोंढा शहराकडे निघाला आहे. याचे कारण तो शेतीतून निर्वासित होत आहे.

शेतकऱ्यांवर अशा तऱ्हेने निर्वासित होण्याची वेळ यावी हेच दुर्दैव म्हणायला हवे. पण अशी वेळ येण्याचे कारण म्हणजे



शेतमालाच्या विक्रीतून त्याचा खर्चही निघत नाही. मग नफा मिळणे तर दूरच अशी परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत शेती परवडत नाही म्हणून त्यातून बाहेर पडणारे हे निर्वासित हेच खरे गरीब आहेत. पण हे गरिब मुळात आले कोठून आणि त्यांच्यावर ही वेळ का आली याचा फार खोलात जाऊन विचार केला जात नाही. या देशातील राज्यकर्त्यांचे धोरण वर्षानुवर्षे शेतकऱ्यांचे शोषण व्हावे अशाच प्रकारचे राहिले आहे. त्यामुळे पोटाची आग शमवण्यासाठी कामाच्या शोधात बाहेर पडणारे हे लोंढे नागरी वस्तीसमोर प्रश्नचिन्ह बनून राहिले आहेत. त्यातून कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण पान ५ वर ▶

# कृषीप्रधान देशात शेतीची दूरवस्था

▶ पान ४ वरुन

होत आहे. अशा परिस्थितीत हे लोंढे थोपवण्याबाबत काही धोरण राबवण्यात राज्यकर्त्यांना रस नाही.

या पार्श्वभूमीवर गेल्या आठवड्यात नामवंत अर्थतज्ज्ञ अशोक गुलाटी मुंबई भेटीवर आले होते. विशेष म्हणजे ते कृषीमूल्य आयोगाचे अध्यक्षही आहेत. कृषी क्षेत्रासंदर्भात चर्चा करताना ते नकळत एक जळजळीत सत्य बोलून गेले. ते म्हणाले की, ''शेतकऱ्यांना उत्पादनखर्चावर आधारित भाव देणे अशक्य आहे.'' एका अर्थतज्ज्ञाने अशी कबुली देणे ही खऱ्या अर्थाने या व्यवस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच होणारे शोषण निर्लज्जपणे मान्य करणेच आहे. आतापर्यंत आमच्यासारखे चळवळे लोक शेती तोट्याची आहे असे म्हणत. आता मात्र कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्षच तसे म्हणू लागले आहेत. खरे तर यामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबायला तयार नाहीत. देशाचे एकूण अंदाजपत्रक नऊ लाख कोटी रूपयांच्या आसपास असते. पण ६२ टक्के जनता अवलंबून असलेल्या कृषी क्षेत्रासाठी अवघ्या १७ हजार ५२२ कोटी रुपयांची तरतूद केली जाते. कृषी अनुसंधान संशोधनासाठी चार हजार ९७५ कोटी रूपयांची तरतूद होते. पशुपालन आणि दुग्धव्यवसाय यासाठी अवघ्या १६९६ कोटी रूपयांची तरतूद केली जाते. असे असूनही हे कृषी क्षेत्र सरकारला निव्वळ निर्यातीच्या माध्यमातून ४१ हजार कोटी रुपयांचे परकीय चलन मिळवून देते. त्यात सरकारने अजुनही इथेनॉलबद्दल स्पष्ट धोरण राबवलेले नाही. अन्यथा गरजेपेक्षा अतिरिक्त उत्पादित झालेल्या धान्यापासून आणि उसाच्या मळीपासून त यार होणाऱ्या इथेनॉलमधून इंधनासाठी सशक्त पर्याय उपलब्ध होऊ शकला असता. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून अन्नधान्याच्या किंमती फार न वाढवतासुध्दा शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न सोडवता आले असते. पण राज्यकर्त्यांना आणि लाल फितीच्या आत बसलेल्या प्रशासनातील दुढ्ढाचार्यांना यात रस नाही. त्यांना फक्त कच्च्या तेलाच्या आयातीत रस आहे. गेल्या सहा महिन्यात निव्वळ कच्च्या तेलाच्या आयातीवर दोन लाख २३ हजार ६५० कोटी रूपये खर्च झाले आहेत. यावरून या मंडळींना कच्च्या तेलाच्या आयातीत का रस आहे हे स्पष्ट



होते. वास्तविक पेट्रोल आणि डिझेलमध्ये फक्त १० टक्के इथेनॉल मिसळण्याचे धोरण राबवले असते तर सध्याच्या दरापेक्षा डिझेल अडीच रूपयांनी आणि पेट्रोल पाच रूपयांनी स्वस्त मिळाले असते. शिवाय यातून शेतकऱ्यांनाही चार पैसे मिळणे शक्य झाले असते. कापसाबाबतही तसेच आहे. साखर, दूध पावडर आणि कांद्याच्या निर्यातीबाबत हेच दिसून येते. मात्र, आयात-निर्यात धोरण ठरवणारे या देशातील ग्राहक आणि उत्पादक यांच्यासाठी धोरणे राबवत नाही तर व्यापारी आणि दलाल यांना प्रचंड नफा कसा होईल याचा विचार करूनही धोरणे आखली जातात की काय असा संशय सामान्यांच्या मनात येत आहे.

अशा परिस्थितीत भविष्यात शेतीचा विकासदर वाढवायचा असेल तर बाजारपेठ, उत्पादन, तंत्रज्ञान, नवनवीन संशोधन या साऱ्यांचा दीर्घकालीन विचार करून आयात-निर्यात संदर्भातील धोरण राबवले जाणे गरजेचे आहे. यामुळे शेतकऱ्यांना तर दिलासा मिळेलच शिवाय ग्राहकांवरही मोठा आर्थिक भार पडणार नाही.

# कादांप्रश्नी स्वाभिमानी आक्रमक होणार

▶ पान ७ वरुन

काढायचे नि दर मात्र ह्यांनी ठरवायचे. हे पध्दत आता बंद झाली पाहिजे. शेतकऱ्यांच्या वाट्याला आता जाल तर त्यांना जन्माची अद्दल घडवू असा इशारा यावेळी त्यांनी दिला. यावेळी दिपक पगार, संघटनेचे उत्तर महाराष्ट्रप्रमुख दीपक पगार यांनी प्रास्ताविक केले. युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष रविकांत तुपकर, अभिमन पगार, प्रदेश चिटणीस डॉ. शरद चव्हाण, कडू धोंडगे, संजय वाघ शिरसमणीकर, भिला ठाकरे आदींची भाषणे झाली. परिषदेस बाजार समितीचे संचालक नानाजी दळवी, भिकाजी सोनवणे, प्रकाश निकम, सुधाकर पाटील, जगदीश इनामदार, संतोष पगार, मविप्र संस्थेचे संचालक भरत कापडणीस, कडू धोंडगे, डोंगर पगार, सुधाकर पाटील, सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष कुबेर जाधव, भास्कर सोनवणे, मनसेचे देवेंद्र जाधव, डॉ. संभाजी अहिरे, वसाकाचे संचालक शांताराम जाधव, अमृता बिरारी, फुला जाधव, श्याम गायकवाड, चंद्रकांत सूर्यवंशी, कैलास बोरसे, अतुल अहिरे, संदीप पाटील, पप्पू धोंडगे, संतोष पगार, शेखर पाटील, धनंजय धोंडगे, युवराज पगार, शांताराम पगार आदींसह हजारो कांदा उत्पादक शेतकरी उपस्थित होते. डॉ. शरद चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. अभिमन पगार यांनी आभार मानले. दरम्यान, कांदा परिषदेनंतर सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष कुबेर जाधव यांच्या निवासस्थानी खासदार शेट्टी यांची पत्रकार परिषद झाली.

## कांदा परिषदेतील ठराव

- कांद्याला राज्य शासनाने ८९७ रुपये हमीभाव जाहीर केला असताना यापेक्षा कमी भावात व्यापाऱ्यांना कांदा खरेदी करण्यास परवानगी देण्यात येऊ नये.
- कांदा लागवडीची खरी माहिती उपग्रहानुसार संकलित करावी.
- कांद्यासाठी मागणीच्या प्रमाणात देशांतर्गत रेल्वे वाहतूक सेवा उपलब्ध करण्यात यावी.
- कांद्याची निर्यात करताना निर्यातशुल्काची अट रद्द करावी.

# अडवणूक कराल तर चौकात चोपू

## बेडग परिषदेत राजू शेट्टी यांचा बेदाणा व्यापाऱ्यांना इशारा

मिरज : बँकांच्या कर्जवसुलीची भीती दाखवून शेतकऱ्यांची अडवणूक करण्याचा प्रयत्न केला तर व्यापाऱ्यांचे भर चौकात कपडे काढू, असा इशारा खासदार राजू शेट्टी यांनी बेडग येथे दिला. श्री. शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत येथे बेदाणा-हळद परिषद झाली. आम्ही उसाची दांडकी घेऊन कारखानदारांच्या मागे लागलो. तुम्ही द्राक्षावरील जहाल औषधांच्या बाटल्या घेऊन टग्यांच्या मागे लागा, असे आवाहन करून पाच दिवसांत या प्रश्नी तोडगा निघाला नाही तर बेदाणा विक्रीची समांतर व्यवस्था राबवू, असा इशाराही त्यांनी दिला.

परिषदेत शेट्टी यांनी सांगली जिल्ह्यातील नेते, व्यापारी आणि बाजार समिती या सर्वांवरच घणाघाती टीका केली.

दुष्काळग्रस्तांना पाणी दिले म्हणून छाती फुगवून केसाने गळा कापणाऱ्यांच्या भूलथापांना बळी पडू नका, असे आवाहन करून

ते म्हणाले, ''आजपर्यंत सगळ्यांनीच बेदाणा उत्पादकांना केवळ चांगले पिकवायला शिकवले आहे; पण यापुढे आता शेतकऱ्यांनी विकायला शिकले पाहिजे. बेदाण्याचा मोठा ग्राहक हा शेतकरीच आहे. त्यामुळे अगतिक होऊन मातीमोलाने बेदाणा विकू नका आणि कोणाच्या भूलथापा, धमक्यांनाही बळी पडू नका. चमत्कार दाखविल्याशिवाय नमस्कार मिळत नसतो. सोशिकता केव्हाच संपली आहे. त्यामुळे आता कोणी आमच्या नादाला लागू नये. नुसत्या बैठकांची नाटके करून शेतकऱ्याला फसविता येणार नाही.''

पान १४ वर ▶

# शेतकऱ्यांना खलनायक ठरवले जात आहे

## राजू शेट्टी : अफू शेतीप्रकरणी संघटना राहणार पाठीशी

राजापूर : ''ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अफूची लागवड आणि कायद्याचे फारसे ज्ञान नसून अफूच्या लागवडप्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या शेतकऱ्यांनी कोणताही गैरप्रकार केलेला नाही. ते खलनायक असल्याचे चित्र रंगविले जात आहे'', अशी तीव्र प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटेने खासदार राजू शेट्टी यांनी आज येथे व्यक्त केली.

आमदार राजन साळवी यांच्याकडे खासगी भेटीसाठी श्री. शेट्टी आज येथे आले होते. तेव्हा येथील शासकीय विश्रामगृहावर ते पत्रकारांशी बोलत होते. गृहमंत्री आर.आर. पाटील यांच्या सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात अफूची लागवड झाल्याचे दोन दिवसांपूर्वी उघड झाले आहे. त्या भागातील काही गावांमध्ये लागवड केलेल्या अफूच्या शेतीवर पोलिसांनी छापा टाकून काहींना ताब्यातही घेतले आहे. या पार्श्वभूमीवर श्री. शेट्टी यांना पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. दुर्गम भागात राहणाऱ्या या शेतकऱ्यांना अफूच्या लागवडीविषयी फारसे ज्ञान नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



''पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या शेतकऱ्यांनी अफूची लागवड केलेली नाही. त्यांनी बाजारातून खसखस विकत घेऊन त्याची लागवड केली होती. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या शेतकऱ्यांनी फारसा मोठा गुन्हा केलेला नाही. तरीही त्यांना पोलिसांकडून मोठे गुन्हेगार ठरवून वागणूक दिली जात आहे'', असे सांगून त्यांनी याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या मालाला शेतीचा उत्पादन खर्च भरून निघण्याएवढा भाव मिळत नसल्याने शेतकरी आत्महत्या करत असल्याचा अहवाल टाटा इन्स्टिट्यूटने उच्च न्यायालयाला सादर केला होता. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या पुनर्वसन पॅकेजमध्येही मोठ्या प्रमाणात घोटाळे झाल्याचा आरोप शेट्टी यांनी केला. मालाला योग्य भाव मिळत नसेल, तर शेतकऱ्यांनी नेमके काय करावे? गळफास लावून आत्महत्या कराव्या, नक्षलवादी व्हावे की अफूची लागवड करावी, याचे उत्तर समाजाने द्यावे असेही मत त्यांनी व्यक्त केले. कायद्याच्या परिभाषेत त्या शेतकऱ्यांनी गुन्हा केला असला, तरी स्वाभिमानी शेतकरी संघटना त्या शेतकऱ्यांच्या पाठीमागे ठामपणे उभी असून वेळप्रसंगी संपूर्ण महाराष्ट्र पेटविला जाईल. सर्व शेतकरी संघटना त्या शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभ्या राहतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# पोलिस, महसूलवर गुन्हे दाखल करा

## राजू शेट्टी : उगवण क्षमता नष्ट न करता बाजारात आणलीच कशी?

शिराळा : शिराळा तालुक्यातील शेतकऱ्यांनी खसखशीचे पीक अज्ञानातून घेतले आहे. शासनाला गुन्हेच दाखल करावयाचे असतील तर प्रथम महसूल, कृषी व पोलिस खात्यावर गुन्हे दाखल करा; मगच शेतकऱ्यांच्यावर करा. विनाकारण पोलिस शेतकऱ्यांना वेठीस धरणार असेल तर या शेतकऱ्यांच्या पाठीशी राज्यातील शेतकरी उभा राहिल, असा इशारा खासदार राजू शेट्टी यांनी आज शासनाला दिला.

शासकीय प्लॉटमधून बाजारात येणाऱ्या खसखशीची उगवण क्षमता नष्ट न करता ती बाजारात आणलीच कशी, याचे उत्तर आधी शासनाने द्यावे, असे आव्हानही त्यांनी दिले. पाडळी (ता. शिराळा) येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. ते म्हणाले, ''शेतकऱ्यांनी अज्ञानातून घरगुती वापरासाठी खसखस पिकविली आहेत.

त्यातून अफू तयार होते, हे त्यांना माहिती नाही. कृषीच्या पदव्या घेणाऱ्यांना याचा शोध घेता आला नाही; पीकनोंदणी करणाऱ्या तलाठ्यांच्या नजरेतून पिके सुटली; मग शेतकऱ्यांना का जबाबदार धरता? वाळूउपसा, खाणींचे उत्खनन, पेट्रोल, डिझेल भेसळसाठी हप्ते घेतले जातात म्हणून त्यांच्यावर कारवाई नाही. ऊस, मका, गहू, बाजरी, भात यांना दर मिळत नाही म्हणून शेतकऱ्यांना खसखशीचा मोह झाला. त्यात त्यांची काय चूक?''

### मंत्र्यांना फि रू देणार नाही?

सदाभाऊ खोत म्हणाले, ''तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाठीशी जिल्ह्यातील मंत्री ठाम उभे राहिले नाहीत तर त्यांना गावात फि रून देणार नाही.'' रणधीर नाईक म्हणाले, ''तालुक्यातील शेतकऱ्यांनी देशद्रोह केल्याचा भास निर्माण केला जात आहे. खसखशीचे पीक पारंपरिक आहे. पिकावर बंदी असल्याचे कृषी विभागाने सांगितले नसल्याने त्यांच्यावर आधी गुन्हे दाखल करा. बोंडे खरेदी करणाऱ्यांवर कारवाई करावी.'' राजू पाटील यांनी स्वागत केली. बाबासाहेब पाटील,अरुण पाटील, राम पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

### जंगलातील भानगडी पाहा!

**गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्यावर पालकमंत्री पतंगराव कदम टीका करत आहेत; परंतु त्यांनी त्यांच्या जंगलात चाललेल्या भानगडी पाहून मग दुसऱ्यांच्यावर टीका करावी. त्यांना आमचे शेतकरी पोलिसांना हप्ते देणारे वाटतात का, असा सवाल खासदार शेट्टी यांनी उपस्थित केला.**

### हत्तीसाठी ५००; मग पोलिसांसाठी किती?

डॉ. पतंगराव कदम यांच्या हत्तीने शेतीचे नुकसान केले तर ५०० रुपये नुकसानभरपाई दिली जाते; मग खसखस पीक शोधत असताना आर. आर. आबांच्या पोलिसांनी शेतीच्या केलेल्या नुकसानभरपाईला ते किती देतात, हे पाहूया, असे खासदार शेट्टी यांनी म्हणताच सर्वत्र हशा पिकला.

# बेदाणा आंदोलनातही खासदार शेट्टी

## राज्य, केंद्र सरकारविरुद्ध लढा

सांगली : दूध, ऊस या दराच्या आंदोलनानंतर आता बेदाणा दरासाठी खासदार राजू शेट्टी यांनी आंदोलनात उडी घेतली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे बेडग (ता. मिरज) येथे शनिवारी ( ता. ३) पहिली बेदाणा परिषद होणार आहे. त्यात बेदाणा दरासाठीचा राज्य व केंद्र सरकारकडे लढा देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येणार आहे.

व्यापाऱ्यांनी बेदाण्याचे दर पाडल्याने गेली आठ दिवसांपासून सांगली, तासगाव येथील बेदाण्याचे सौदे बंद आहेत. सौदे सुरू करण्यासंदर्भात बाजार समितीने बैठक घेतली, मात्र त्यात तोडगा निघाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी काल बाजार समितीवर धडक मारत बेदाण्यास गुणवत्तेनुसार प्रती किलो दोनशे, दीडशे व शंभर रुपये असा दर देण्याची मागणी केली. मात्र, बाजार समितीने त्याबाबत हात झटकले आहेत. इतर प्रश्नावर चर्चा करण्यासाठी उद्या (ता. २९) बैठक घेण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे शेतकरी परतले. मात्र, उद्याच्या बैठकीबाबत व सौद्याबाबत बाजार समितीचे पदाधिकारी रात्री उशिरापर्यंत काही सांगू शकत नव्हते.


बेदाणा आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते उतरले आहेत. आता खासदार शेट्टीही स्वतः उतरणार आहे. आंदोलनाची रणनीती ठरवण्यासाठी बेदाणा उत्पादकांची पहिलीच परिषद मिरज तालुक्यातील बेडग येथे शनिवारी होणार आहे. बेदाणा उत्पादकांचे प्रश्न व बेदाण्याचे दर यासंदर्भात राज्य व केंद्र सरकारकडे लढा देण्याबाबतचे धोरण परिषदेत ठरवण्यात येणार आहे. दरम्यान, गेली आठ दिवसांपासून सौदे बंद असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. किमान उद्यातरी सौदे सुरू होतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांची आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीतबैठक

बेदाणा दराच्या निश्चितीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गुरुवारी (ता. १) बैठक झाली मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी गुरुवारची वेळ दिली आहे. दुपारी चार वाजता झालेल्या या बैठकीला बाजार समितीचे संचालक, शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, बेदाणा उत्पादक शेतकरी उपस्थित होते, तशी माहिती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष महादेव कोरे यांनी दिली.

### सौदे सुरू करण्याचे बाजार समितीचे आवाहन

येथील मार्केट यार्डात बेदाण्याचे सौदे पूर्ववत सुरू करण्यात यावे. शेतकरी, खरेदीदार व अडत्या यांना समितीतर्फे संरक्षण देण्यात येईल. शेतकऱ्यांचे हीत व त्यांचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेऊन सौदे सुरू करावेत, असे आवाहन समितीचे सभापती वैभव पाटील यांनी पत्रकाद्वारे केले आहे.






बागणी : खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते जिनिअस स्टुडंट अँवॉर्ड स्वीकारताना असिफ वठारे व सोबत अन्य.

# बागणीत स्नेहसंमेलन उत्साहात

बागणी : जिनिअस इंग्लिश मीडिअम स्कूलचे स्नेहसंमेलन विविध गुणदर्शनात झाले. शालेय अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

येथील असिफ सलीम वठारे इयत्ता दुसरी याला जिनिअस स्टुडंट अँवॉर्ड खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते देण्यात आला. कार्यक्रमांचे प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य महेश पोळ यांनी केले. किरण थोरात यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी एस. के. यादव, पुंडलिक पोळ, महेंद्र लोखंडे, संस्थापक विद्या पोळ उपस्थित होते. लता पोळ यांनी आभार मानले.



बेडग : येथे झालेल्या हळद-बेदाणा परिषदेत बोलताना खासदार राजू शेट्टी.

# अडवणूक कराल तर चौकात चोपू

▶ पान ८ वरून

दहा वर्षापूर्वी आम्ही ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आंदोलनात उतरलो तेव्हा तुम्हाला लुटणारे हेच लुटारू राजू शेट्टी म्हणजे गाढवाचे पिल्लू आहे आणि त्याच्या शेपटाला कोणीतरी डबा बांधल्याचे हिणवत होते, याची आठवण करून देऊन ते म्हणाले, ''आता हेच गाढवाचे पिल्लू प्रस्थापितांच्या छाताडावर बसून लाथा मारू लागल्याने त्यांची तोंडे बंद आहेत. ऊस उत्पादक शेतकरीही थोडाफार समाधानी आहे. हे सगळे करताना ऊस उत्पादकांनी आमच्यावर मोठा विश्वास दाखविला तसा बेदाणा उत्पादकांनी दाखविणे अपेक्षित आहे.''

बेदाण्याचे दर पाडण्याचे कारस्थान ३१ मार्चची कर्जवसुली डोळ्यांसमोर ठेवून रचले आहे; पण आम्ही कोणाचेही कर्ज बुडविण्याच्या भूमिकेत नाही. नुसत्या कर्जासाठी आमचा सोन्यासारखा माल मातीमोलाने घेणार असाल तर मात्र आम्ही तुम्हाला सोडणार नाही, असा इशारा देऊन श्री. शेट्टी म्हणाले, ''द्राक्ष उत्पादकांवर आमचे चांगले लक्ष होते. अजून उशीर झालेला नाही. कर्जाची भीती दाखवून शेतकऱ्याचा अपमान करणारा कोणीही असो त्याला चौकात कपडे उतरवून चोप देण्याची ताकद आमच्यात आहे, हे सगळ्यांनीच ध्यानात ठेवावे.''

अत्यंत कमी वेळात आयोजित केलेल्या या पहिल्याच परिषदेसाठी जत, उमदी येथूनही अनेक शेतकरी आले होते. यावेळी प्रा. जालंदर पाटील, प्रा. दाडिबुडे यांची भाषणे झाली.



# कांदा लागवड फायदेशीर

कांदा हे भारतातील अत्यंत महत्त्वाचे पीक असून त्याची वर्षभर मागणी बाजारातून असते. देशातील कांद्यांचे उत्पादन कमी, त्याचबरोबर साठवणुकीत होणारे नुकसानही जास्त असल्याने त्याच्या उपलब्धतेवर आणि बाजारभावावर सतत परिणाम होत असतो. राज्यात बहुदा सर्व जिल्ह्यात कांद्यांची लागवड केली जाते. कांद्यांचे लागवड सर्व हंगामात केली जाते. परंतु कांद्यांचे साठ ६० टक्के उत्पादन हे रब्बी हंगामात घेण्यात येते. त्याची काढणी प्रामुख्याने एप्रिल मे महिन्यामध्ये होते. हा कांदा ३ ते४ महिने साठवणूक केल्यास ऑक्टोबर – नोव्हेंबर पर्यंत ते खरीप पिकाचे उत्पादन निघेपर्यंत सुस्थितीत राहू शकतो. देशातील संपूर्ण बाजारपेठ जून ऑक्टोबर पर्यंत साठवणुकीतील कांद्यावर अवलंबून असते. या कालावधीत देशात कोठेही मोठ्या प्रमाणात कांद्यांची काढणी चालू असते. म्हणून शेतकऱ्यांनी कांद्यांची लागवड अशा तऱ्हेनी करावयाचे की कांदा शक्यतो जुलै ते ऑक्टोबर या दरम्यान मार्केटला याया यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगले दर मिळू शकतात. सद्या कांद्याला भाव फारच आहे. म्हणून कांद्यांची लागवड करून फायदा करून घ्यावा. कांद्यांची लागवड उत्तम तऱ्हेने करण्याती पध्दत खाली दिले आहे. त्याचा उपयोग करून घेऊन शेतकऱ्यांनी कांदा लागवड करून घ्यावे. जमिन व हवामान : लागवडीसाठी हलक्या मुरमाच्या व उताराच्या जमिनी निवडाव्यात. व ह्यात उताराशी समातंर

**पिक-पाणी**


**डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले**
प्लॉट नं. २९, चंद्रयन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५


पान १६ वर ▶

# कांदा लागवड फायदेशीर

▸ पान १५ वरुन

रूंद गादीवाफे करावेत. गादीवाफ्याची लांबी १२० सें.मी. असावी व दोन बाजूच्या सऱ्या एक फूट रूंदीच्या असाव्यात. गादीवाफ्यावर रोपांची लागवड केल्यास जादापाण्यामुळे अथावा पावसाचे पाणी साठल्यामुळे कांदा सडणे किंवा मान लांबणे हे प्रकार होत नाहीत. सरी वरब्यांत कांदा घेता येतो. पण सरीत पाणी बराच काळ साचून राहिले व पाणी व्यवस्थित वाफ्याच्या बाहेर काढता आले नाही तर सड वाढते. याशिवाय सरी वरंब्यात रोपांच्या संख्या लागवडीत बसते. रोपांची लागवड १० बाय १५. १५ बाय १५ सेंमी. अंतरावर पून काढणी करावी. रोप लागवड करताना ती अंगठ्याने दाबू नये यामुळे माना वाकड्या होऊन वाढीस वेळ लागतो.



२) कांद्यांची जातः शक्यतो पारंपारिकरित्या वाढवलेल्या हळवा बी न वापरता कांदा संशोधन केंद्र, कृषि विद्यापीठ यांच्या कडून बीयाणे ७८०, फुले समर्थ ॲग्रीफाउंड डार्क, रोड, अर्क कल्याण, भीमा सुपर जातीचा वापर करावा.

३) खतांच्या मात्रा : कांद्यासाठी प्रती हेक्टरी १०० ते १२५ किलो नत्र ७५ किलो स्फुरद व ७५ कि. पालाश व ५० कि. सल्फर (गंधक) या खते वापरावीत. तसेच १० टन शेणखत व ५ टन कंबडी खत पाळीपूर्वी द्यावे. तसेच ५ ते १० कि. प्रति हेक्टरी ट्रायकोडर्मा व्हीरडी कंपोस्ट खतात मिसळून शेतात समप्रमाणात द्यावा. नंतर रूंद गादीवाफे तयार करण्यापूर्वी हेक्टरी ५० कि. नत्र, ७५ कि. स्फुरद व पालाश प्रत्येकी व बेनस्लफ (गंधक) ५० कि. हे सर्व खते पेरावे. खत पेरून गादी वाफे तयार करावेत. राहिलेले नत्र खताची मात्रा तीन चार आठवड्यात द्यावे. पानांची वाढ रोखण्यासाठी व कांदे पोसण्यासाठी ६० ते ७५ दिवसांचे असताना त्यावर लिहोसील हे वाढ प्रतिबंधक संजिवक फवारा‌वे. १० लिटर टाकीत ६० मिली. लिहोसील मिसळून फवारणी करावी.

४) पाणी व्यवस्थापन : जमिनीची प्रत पाहून ८ ते १० दिवस अंतराने कांद्याला पाणी मोजके द्यावे. कांदा ठिबक किंवा तुषार सिंचनाखाली लागवड करता येतो. शक्यतो कांदा काढणीपूर्वी दोन आठवडे अगोदर पाणी बंद करावे. त्यामुळे कांदा पोसतो, सड कमी होतो, मान जड होत नाहीत.

५) तणांचा बंदोबस्त : कांद्यामध्ये तणांचा बंदोबस्त वेळेवर केले नाहीतर ४० ते ५० टक्के नुकसान होते. म्हणून वेळेवर तणांचा बंदोबस्त करता येते. त्यासाठी रोपांची लागवड करण्यापूर्वी अगोदर वाफ्यावर गोल तणनाशक १५ मिली. १० लिटर पाण्याचा टाकीत मिसळून फवारली तर ४५ दिवसापर्यंत तणांचा उपद्रव होत नाही.

६) रोग व किडीचा बंदोबस्त : जमिनीत पाण्याचा निचरा न झाल्यास करपा, काळ्यट, डाग, माना लांब होतात, पाने पिवळी पडताात. बुडका सडणे, मुळे गुलाबी होऊन खओड कुजणे, असे अनेक रोग दिसून येतात. या रोगाचे नियंत्रण करण्यासाठी पिकांची फेरपालट करावी. पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या हलक्या जमिन लागवडीस वापरावे. शेणखत चांगले कुजलेले असावे. ५ ते १० कि. ट्रायकोडर्मा व्हीरडी वापरावे. रोपांचे मूळ बाविस्टन १ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात लागणीपूर्वी बुडवावेत. डायथेन एम. ४५ किंवा बाविस्टन या बुरशीनाषका सोबत कार्बोसल्फान किंवा एंण्डोसल्फान या किटक नाशकाचा वापर करावा. प्रत्येक फवारणीच्या द्रावणात स्टिकर जरूर वापरावा. फवारणी दर १२ ते १५ दिवसाच्या अंतराने आवश्यकतेनुसार करावी. कांदा रूंद गादी वाफ्यावर केल्यास २५ ते ४० टनापेक्षा जास्त उत्प‌ादन मिळते. तरी कांद्याच्या लागवडीचे वरील तंत्रज्ञान वापरून शेतकऱ्यांनी फायदा करून घ्यावा.